उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर येथील ब्रेक टेस्ट ट्रॅक कडे जाणा-या पोच रस्त्याचे खडीकरण करण्यासाठीच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०२१८/प्र.क्र.४६/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : २१ एप्रिल २०१८

वाचा :

१) **शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०९१६/प्र.क्र.४६५/परि-४, दि.३०.०९.२०१६**
२) **परिवहन आयुक्त कार्यालयाचे क्र.ब्रेचाप-(३४)/०९१६/न.क्र.१९/का-१०(१)/जा.क्र.३०४२, दि.२२.०२.२०१८**

प्रस्तावना :

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.२८/२०१३ (श्रीकांत कर्वे वि.महाराष्ट्र शासन) मध्ये दि.१८.०२.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर येथे २५० मीटर लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधण्यासाठी शासनाच्या संदर्भाधीन क्र.१, दि.३०.०९.२०१६ च्या ज्ञापनान्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात आली आहे. त्याठिकाणी ब्रेक टेस्ट ट्रॅकचे काम पूर्ण झाले असून सदर ब्रेक टेस्ट ट्रॅक कार्यान्वित झाला आहे. सदर ब्रेक टेस्ट ट्रॅकवर जाण्यासाठी विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांच्याकडून मौजा चांदा रै. येथील सर्व्हे क्र.४६१ व ४६२ (कं.नं.५७२)मधील ०.३५ हे.आर. एवढी जागा पोच मार्गासाठी प्राप्त झाली आहे. सदर पोच मार्ग मातीचा असल्यामुळे पावसाळ्यात ब्रेक टेस्ट ट्रॅक कडे जाण्याचा मार्ग बंद होऊन अडचण निर्माण होणार आहे. त्यामुळे सदर पोच मार्गाचे खडीकरण करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठीच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

परिवहन आयुक्त कार्यालयाने संदर्भाधीन क्र.२, दि.२२.०२.२०१८ च्या पत्रान्वये सादर केलेल्या उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर येथील ब्रेक टेस्ट ट्रॅककडे जाणा-या पोच मार्गाचे खडीकरण करण्यासाठीच्या रु.२३,२४,८५२/- (रुपये तेवीस लक्ष चोवीस हजार आठशे बावन्न फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

Sr.No.	Particulars	Amount (In Rs.)
१	Cost of details estt	१९,२१,३६५.००
	Add ४ % Contingencies	७६,८५५.००
	Add १२ % GST	२,३०,५६४.००
	Add ५% Centage	९६,०६८.००
	Total	२३,२४,८५२.००

२. सदर मान्यता विभागाने उपरोक्त खर्च त्यांच्याकडील उपलब्ध निधीतून भागवावा तसेच, उपभोक्ता विभागाच्या वतीने सक्षम प्राधिका-याचे साक्षांकन आवश्यक आहे. या अटीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

३. यासाठी येणारा खर्च मागणी क्र.बी-३, २०४१ वाहनांवरील कर, (०१)(०६) वाहन चालविण्यासाठी चाचणी घेताना गुणात्मक वाढ करण्याकरिता पायाभूत सोयीमध्ये दर्जावाढ करणे, कृत्रिम चाचणी पथ बांधणे (कार्यक्रमांवरील) (२०४१ ०३२१) १३-कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३१३/इमा-२, दि.२०.०४.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीने तसेच, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ भाग-एक, उपविभाग-५, अ.क्र.१ व सा.बां.विभाग नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४ नुसार तसेच, वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ मधील परिच्छेद क्र.६ अ) नुसार असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२११७११०२७०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.04.21 17:12:46 +05'30'

(द.ह. कदम)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव

३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव

४. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई /नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर
८. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर
१२.उप सचिव (इमा) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.निवडनस्ती (परि-४)